‘‘मराठवाड्याच्या राजकारणात भारिप-बहुजन महासंघाची भूमिका आणि कार्य एक चिकित्सक अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेतंर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.(Ph.D) पदवीकरीता सादर करावयाच्या शोधप्रबंधाची प्राथमिक रुपरेषा आराखडा

संशोधक

अशोक गोविंदराव पंडित

मार्गदर्शक

डॉ.प्रभाकर दिगांबरराव सुर्यवंशी

सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख राज्यशास्त्र,
स्वा.सै.सुर्यभानजी पवार महाविद्यालय पुर्णा (ज.)
ता.पुर्णा जि.परभणी

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

मे - २०१९

''मराठवाड्याच्या राजकारणात भारिप-बहुजन महासंघाची भूमिका आणि कार्य एक चिकित्सक अभ्यास''

प्रस्तावना :

सरजामशाही, राजेशाही नष्ट होणाच्या प्रक्रियेत आणि राष्ट्र-राज्य व्यवस्था भांडवलशाही लोकशाही उदयाच्या प्रक्रियेत प्रथम युरोपीयन राष्ट्रात राजकीय पक्षांचा उदय झालेला दिसून येतो. सत्ता प्राप्त करण्याच्या उद्देशाने समविचारी, समान हित संबंधाचे, समान विचारसरणीचे लोक एकत्र येवून सत्ता प्राप्त करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करतात. अशा लोकसमुहास राजकीय पक्ष म्हणून ओळखले जाते.

भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांचा एकछत्री अंमल प्रस्थापित होणाऱ्या प्रक्रियेत येथील राजेशाही नष्ट झाली. ब्रिटिश साम्राज्याविरुध्द स्थानिक लोकांचा असंतोष वाढत गेल्यामुळे स्थानिक लोक संघटित होऊन संघर्ष करु लागले. जनतेचा असंतोष लक्षात घेता ब्रिटिशांनी हळूहळू स्थानिक लोकांना त्यांचा असंतोष कमी करण्यासाठी थोड्याफार प्रमाणात सत्तेत सामील करुन घ्यायला सुरुवात केली. हळूहळू लोक संघटित होवून स्वराज्याची मागणी करु लागले, स्वातंत्र्याची मागणी करु लागले. तेंव्हा ब्रिटिशांनी वेळोवेळी विविध कायदे करुन त्यांना अधिकाधिक स्वायत्तता देण्याला, सत्तेत सहभाग देण्याला सुरुवात केली. तेव्हा ब्रिटिशांविरुध्द स्वराज्यासाठी, स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारे विविध लोक समुहांचे संघटित गट निवडणूक प्रक्रियेत सामील होऊन सत्ता प्राप्त करण्यासाठी राजकीय पक्ष म्हणून कार्य करु लागले.

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातच राष्ट्रीय काँग्रेस या प्रमुख पक्षासोबत काही इतरही राजकीय पक्ष अस्तित्वात आले. याच दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृताच्या दास्य मुक्तिचे, शेतकरी, कामगारांच्या दास्य मुक्तिचे प्रामुख्याने बहिष्कृत अस्पृशांसह शेतकरी आणि कामगार यांचे राजकीय, सामाजिक शिक्षण, संघटन, संघर्ष संघटित करुन त्यांच्या मुक्तीचे लढे लढत होते. १९३५ च्या कायद्याने जेव्हा स्थानीक

लोकांना सत्तेत सामावून घेण्यासाठी निवडणुका घेण्याचे ब्रिटिशांनी जाहीर केले. त्या पार्श्वभुमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत - अस्पृश्यवर्गासह कामगार, शेतकरी आदि कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली आणि १९३७च्या निवडणुकीला हा पक्ष सामोरे गेला. या निवडणुकीत 'स्वतंत्र मजूर पक्षाच्या' माध्यमातून सर्व जाती-धर्माच्या लोकांना पक्षाने उमेदवारी दिली. या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाने १५ आरक्षित जागावर उमेदवार उभे केले. यापैकी १३ उमेदवार विजय झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळातच पुढे प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्यात, सत्तेत वेगवेगळ्या सामाजिक समुहांना कशा प्रकारचे प्रतिनिधीत्व असेल या बाबतीत वाद निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत आपणच खरे अस्पृश्य - बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी आहोत, हे सिध्द करुन दाखविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'स्वतंत्र मंजूर पक्ष' बरखास्त करुन १९४२ मध्ये "शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची' स्थापना केली. भारतातील समाजवादी विचारांच्या लोकांना सोबत घेऊन बहिष्कृतांसह शेतकरी, कामगार आदि सर्व कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा एक व्यापक समाजवादी विचारसरणीचा 'रिपब्लिकन पक्ष' स्थापन करण्याचा विचार केला. परंतु हा पक्ष बाबासाहेबांच्या हयातील अस्तित्वात येण्यापूर्वीच बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायानी बाबासाहेबांच्या इच्छेनुसार 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' बरखास्त करुन दिनांक ३ ऑक्टोंबर १९५७ ला नागपूर येथे 'रिपब्लिकन पक्षाची' स्थापना केली.

परंतु 'रिपब्लिकन पक्षाच्या' नेत्यांमध्ये राजकीय हितसंबंधाच्या संघर्षातून मोठ्या प्रमाणात मतभेद होऊन या पक्षाचे विघटन झाले. त्यामुळे दलित तरुण वर्गात असंतोष वाढला. या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर 'दलित पँथर' ही लढाऊ संघटना १९७२ मध्येअस्तित्वात आली. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यातील वैचारिक संघर्षातून 'दलित पँथर' बरखास्त झाली.

१९८२-८३ मध्ये ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांचे आगमन हे दलित-बहुजन चळवळीतील मरगळलेल्या मनाला नवी ऊर्जा देणारे ठरले. ॲड.बाळासाहेबांनी सुरुवातीला वकीली व्यवसाय करुन त्यातून वेळ काढून सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. १९८२ साली मुंबईत बाळासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या सुवर्ण महोत्सवी सम्यक समाज आंदोलन ही संघटना स्थापन करुन त्यांनी सार्वजनिक कार्यात प्रवेश केला. १९८४ मध्ये ॲड.बाळासाहेबांनी समविचारी लोकांची बैठक बोलावली, या बैठकीला अर्जून डोंगळे, प्रा.अविनाश डोळस, लंकेश्वर गुरुजी, निलम गोऱ्हे, पी.एस.धनवे, नागेश सावंत, सुरेश गायकवाड यांच्यासह अनेक निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वांनी सोबत घेऊन १९८४ मध्ये 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला. यानंतर पक्षाची व्याप्ती वाढविण्यासाठी ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली १५.०२.१९९३ मध्ये 'भारिप-बहुजन महासंघ' या पक्षाची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, साम्यवादी पक्षातील भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारिप बहुजन महासंघ आणि इतरही छोट मोठे पक्ष कार्यरत आहेत. पण या सगळ्यापेक्षा भारिप-बहुजन महासंघ हा पक्ष वेगळा आहे आणि या पक्षाचे कार्य मराठवाड्यात असून या पक्षाचा आधार आणि अनुयायी वर्गही मोठ्या प्रमाणात आहे.

१९९३ च्या किनवट विधानसभा पोटनिवडणुकीत 'भारिप-बहुजन महासंघाने' भिमराव केराम यांना निवडूण आणले. परिणामी 'भारिप-बहुजन महासंघाने' महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवून, सर्व जाती-धर्माच्या लोकांना उमेदवारी दिली. . १९९८ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'रिपब्लिकन ऐक्य' बाबत दबाव वाढल्यामुळे झालेल्या ऐक्यातून ॲड.प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वात १९९८ मध्ये लोकसभेसाठी ॲड.प्रकाश आंबेडकर, रा.सू.गवई, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे हे विजयी झाले.

तरीही हे ऐक्य लवकरच संपुष्टात आले. महाराष्ट्रामध्ये इतर नेते सोडून गेले तरी अधिक जलद गतीने भारिप बहुजन महासंघाला दलित-बहुजन वर्गात चांगला जनाधार मिळत गेला. ॲड.प्रकाश आंबेडकरांनी सर्व वंचितांना सोबत घेवून राजकीय मोट बांधण्याचे काम केले. 'भारिप-बहुजन महासंघ' पक्ष स्थापनेपासुन आजपर्यंत ॲड.प्रकाश आंबेडकरांनी स्वबळावर तर कधी समविचारी पक्षासोबत युती करुन निवडणूका लढविल्या आहेत. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर ॲड.प्रकाश आंबेडकरांनी ए.आय.एम.आय.एम. या पक्षासोबत युती करुन महाराष्ट्रात प्रचार सभा घ्यायला सुरुवाती केली. ॲड.प्रकाश आंबेडकरांच्या भारिप-बहुजन महासंघाकडून वंचीत बहुजन समाजाच्या मोठ्या अपेक्षा वाढल्यामुळे त्यांच्या सभांना मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी होऊ लागली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलितांसह सर्व शोषितांना सोबत घेऊन त्यांच्या दास्य मुक्तीचे राजकारण करीत होते. 'भारिप-बहुजन महासंघ' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित वंचित बहुजनाच्या मुक्तीचे राजकारण करीत आहे असे दिसून येते.

समस्या सुत्रण :

१. आंबेडकरवादी म्हणवून घेणाऱ्या पक्ष, संघटना केवळ अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या गरजेतून उदयाला आल्या की त्यासह आंबेडकरवादी दास्यमुक्तीचा ध्येयवाद घेऊन विकसित झाल्या? मोठ्या संघर्षातून उदयाला येणाऱ्या या पक्ष, संघटना विघटित होऊन उध्वस्त का होतात?

२. 'भारिप-बहुजन महासंघ' इतर आंबेडकरवादी पक्षाचीच आवृत्ती आहे का? भारिप-बहुजन महासंघाला कितपत आंबेडकरवादाचे अधिष्ठान आहे. 'भारिप-बहुजन महासंघ' आंबेडकरवादी ध्येयवादावर आधारीत पक्ष आहे का? या पक्षातील कार्यकर्त्यांना त्या ध्येयवादावर संघटित केले जाते का? भारिप-बहुजन महासंघाच्या नेतृत्वाच्या आणि कार्यकर्त्यांच्या विचारात बाबासाहेबांना अपेक्षित 'प्रबुध्द भारत' निर्मितीचे ध्येय आहे का? तुलनात्मक इतर आंबेडकरवादी पक्षांपेक्षा भारिप-बहुजन

महासंघाचे नेतृत्व कार्यकर्ते अधिक ध्येयवादी, अधिक तत्वनिष्ठ, आंबेडकरवादी आहेत का? इतर आंबेडकरवादी पक्ष संघटना संधीसाधू तडजोडीत उध्वस्त झाल्या का?

३. बाबासाहेबांची चळवळ ही ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही विरोधी समान सत्तावादी 'प्रबुध्द भारत' निर्मितीसाठीची चळवळ होती. भारिप-बहुजन महासंघ त्याच ध्येयाने प्रेरित आहे का? बाबासाहेबांच्या नेतृत्वातील चळवळ सर्व दलितांसह सर्व शेतकरी, कामगार कष्टकऱ्यांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शोषण मुक्तीची, जाती अंताची, वर्गांताची, स्त्रीदास्य अंताची क्रांतिकारक वर्गीय चळवळ होती. बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात 'भारिप-बहुजन महासंघ' त्याच प्रमाणे क्रांतिकारक आहे का? 'भारिप-बहुजन महासंघाचे' इतर आंबेडकरवादी पक्षांपेक्षा वेगळेपण काय आहे? याचा आंबेडकरवादाच्या कसोट्यावर शोध घेण्याच्या उद्देशाने संशोधन आवश्यक आहे असे वाटते.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व :

भारताने १९५० साली संविधानाचा स्वीकार करुन संसदीय लोकशाही हा शासन प्रकार प्रस्थापित केला. या संसदीय लोकशाहीची वाटचाल परंपरागत द्विपक्ष पध्दतीच्या दिशेने न होता बहुपक्ष पध्दतीच्या दिशेने झाली. त्यात विविध विचार सरणी व उद्दिष्ट्ये व ध्येय असणारे, उजवे, डावे आणि मध्यममार्गी पक्ष अस्तित्वात आले. त्यात कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, साम्यवादी पक्ष, हिंदू महासभा, जनसंघ कालांतराने निर्माण झालेले जनता पक्ष इत्यादी राजकीय पक्ष अस्तित्वात आले. परंतु प्रस्थापीत राजकीय पक्षांच्या तुलनेत परीवर्तनवादी तसेच वंचित दलितांचे नेतृत्व करणारे राजकीय पक्ष अभ्यासकांच्या दृष्टीकोणातून उपेक्षितच राहिले. लोकशाहीत प्रत्येक विचाराला महत्त्व असते. म्हणून ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या पुढाकाराने स्थापन झालेला 'भारिप-बहुजन महासंघ' हा प्रस्तूत अभ्यासाचा केंद्र बिंदू आहे.

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रात कार्यकर्ते असणाऱ्या महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ.आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारीत असलेल्या परिवर्तनवादी राजकीय पक्षाचा अभ्यास आहे. यात पक्षाचे स्वरुप समजून घेवून त्यांच्या भुमिकेचा आणि कार्याचा आढावा घेणे हा अभ्यासाचा एक उद्देश आहे. 'भारिप-बहुजन महासंघाने' दलित, आदिवासी, कामगार, शेतकरी, ओबीसी, अल्पसंख्यांक यांचे प्रश्न घेवून सोडविण्याचा प्रयत्न केला. म्हणून 'मराठवाड्याच्या राजकारणात भारिप-बहुजन महासंघाची भुमिका आणि कार्य' एक चिकित्सक अभ्यास हा विषय निवडला आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य -

आंबेडकरवादी विचारधारा राजकारणामध्ये कितपत प्रभावी ठरली आहे हे जाणून घेण्यासाठी दलित, वंचित, कामगार, शेतकरी, कष्टकरी यांच्या राजकीय ध्येयवादाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि सत्तेच्या राजकारणाची उकल होण्याच्या दृष्टीने तसेच मराठवाड्याच्या राजकारणात प्रस्थापित राजकीय पक्षांपुढे आव्हान निर्माण करुन एक राजकीय पर्याय उभा केला आहे, म्हणून प्रस्तुत संशोधनाला विशेष महत्त्व आहे असे वाटते.

संशोधन कार्याची उद्दिष्ट्ये :

१. भारिप-बहुजन महासंघाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अधोरेखित करणे.

२. भारिप-बहुजन महासंघाचे नेतृत्व संधीसाधू राजकारणापासून आलिप्त असलेले अधिक तत्वनिष्ठ, ध्येयवादी आंबेडकरवादी नेतृत्व आहे का? याचा शोध घेणे.

३. इतर आंबेडकरवादी पक्ष - संघटनांच्या तुलनेत भारिप बहुजन महासंघाचे वेगळेपण काय आहे याचा शोध घेणे / अभ्यास करणे.

४. 'भारिप-बहुजन महासंघ' आंबेडकरवादानुसार दलित, बहुजन, वंचित कष्टकरी वर्गाचा पक्ष तो वंचित शोषितांचा दास्यमुक्ती पक्ष म्हणून कितपत यशस्वी झाला याचा शोध घेणे.

५. महाराष्ट्रातील सत्तेच्या राजकारणाला दिशा देण्यात आघाड्याच्या राजकारणात भारिप-बहुजन महासंघाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.

वरील सर्व उद्दिष्टांचा एक संशोधक म्हणून तटस्थपणे आणि निःपक्षपातीपणे अभ्यास करणे.

गृहितके :

१. भारिप-बहुजन महासंघाच्या उदय-विकासाला आंबेडकरवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी आहे.

२. इतर आंबेडकरवादी नेतृत्वाच्या तुलनेने भारिप-बहुजन महासंघाचे नेतृत्व ॲड.प्रकाश आंबेडकर हे संधीसाधू राजकारणापासून अलिप्त असलेले आंबेडकरवादी नेतृत्व आहे.

३. इतर आंबेडकरवादी म्हणवून घेणाऱ्या पक्ष संघटनापेक्षा भारिप-बहुजन महासंघ अधिक तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी, आंबेडकरवादी पक्ष आहे.

४. भारिप-बहुजन महासंघ हा पक्ष दलित, बहुजन, वंचित घटकांसह कष्टकरी वर्गाचा पक्ष आहे.

५. भारिप-बहुजन महासंघाचा 'तत्त्व आणि व्यवहार' आंबेडकरवादी आहे.

६. भारिप-बहुजन महासंघ देशातील दलित-बहुजन, वंचित, कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांचा दास्यमुक्तीचा मार्ग विशेषतः मराठवाड्याच्या राजकीय प्रश्नांना, सामाजिक प्रश्नांना प्रशस्त करीत आहे.

७. महाराष्ट्रातील सत्तेच्या राजकारणाला दिशा देण्यात या पक्षाची भुमिका राहिली.

संशोधन पध्दती :

सामाजिक संशोधन करतांना संशोधकाला विविध शास्त्रीय पध्दतीचा व तंत्राचा अवलंब करुन सिध्दांताचे प्रतिपादन करावे लागते. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, सहेतूक नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत विषयाचे उद्दिष्ट्ये व महत्त्व यांना केंद्र बिंदू मानून भारिप-बहुजन महासंघाने महाराष्ट्रामध्ये विविध क्षेत्रात कामगिरी केली आहे. म्हणून या पक्षाच्या मराठवाड्याच्या राजकारणातील भुमिचे अध्ययन करतांना १९८४ ते २०१९ या कालावधीपर्यंतचा अभ्यास करण्यात येईल तसेच हे संशोधन करतांना इतर पक्षांचे आवश्यकतेनुसार संदर्भ येतील हीच या संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा असेल.

तथ्यसंकलन :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनात तथ्य ही महत्त्वाची असतात. कारण घटनांचे अध्ययन करुनच त्या घटना संबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते. त्या तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात.

१. प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन कार्य पार पाडत असतांना भारिप-बहुजन महासंघाचे प्रमुख नेते, कार्यकर्ते, लाभार्थी यांच्या मुलाखती घेवुन तथ्य संकलन करण्यात येईल. प्रश्नावली आणि निरिक्षण पध्दतीचाही अवलंब करण्यात येईल तसेच भारिप-

बहुजन महासंघाच्या विचार सरणीशी अनुसरुन तसेच उद्देश आणि जाहीरनाम्याच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या मुळ कागदपत्राच्या आधारे तथ्य संकलन करण्यात येईल.

२. दुय्यम स्त्रोत :

भारिप-बहुजन महासंघ या पक्षा विषयी अभ्यासकांनी, विचारवंतांनी व्यक्त केलेली मते, संशोधन साहित्य, ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, मासिके, पाक्षिके - आदींचे संदर्भ घेऊन त्या आधारे संशोधन कार्यासाठी आवश्यक तथ्य संकलन करण्यात येईल.

प्रकरण रचना :

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी पाच प्रकरणामध्ये करण्यात येईल, ती पुढील प्रमाणे

प्रकरण पहिले - विषय प्रवेश :

या पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तुत विषयाच्या संशोधन आराखड्यासंबंधी मांडणी करण्यात येईल. त्यात प्रस्तावना, समस्यासुत्रण, संशोधन विषय निवडीचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके संशोधन पध्दती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा तथ्य संकलन पध्दती या संबंधी माहिती देण्यात येईल.

प्रकरण दुसरे - भारिप बहुजन महासंघाचे वैचारिक अधिष्ठान आणि नेतृत्व :

या दुसऱ्या प्रकरणात भारिप-बहुजन महासंघाचे वैचारिक अधिष्ठान आणि नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आणि राजकीय कार्य या विषयाचा आढावा घेण्यात

येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे विभाजन कशा पध्दतीने घडुन आले याची मांडणी करण्यात येईल व त्यामागील वैचारिक भुमिका व नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येईल. विशेषतः ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे - भारिप-बहुजन महासंघाची राजकीय वाटचाल :

या तिसऱ्या प्रकरणात भारिप-बहुजन महासंघाचा मराठवाड्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीतील यशापयशाची विश्लेषणात्मक मांडणी करण्यात येईल.

प्रकरण चौथे - भारिप-बहुजन महासंघाची मराठवाड्याच्या राजकारणात भूमिका आणि कार्ये :

या चौथ्या प्रकरणात भारिप-बहुजन महासंघाची भुमिका आणि कार्य यांचा आढावा घेण्यात येईल. विशेषतः मराठवाड्यात भारिप-बहुजन महासंघाने विविध क्षेत्रात केलेले कार्य भुमिहीनाचा लढा, विद्यापीठ नामांतर लढा, भारिप-बहुजन महासंघाची स्त्रीविषयक भुमिका, पक्षाने घेतलेल्या महिला परिषदा, ओबीसी समूहाच्या संदर्भात पक्षाची भुमिका ओबीसी शिष्यवृत्ती लढा, पोटा कायदा, विरोधी परिषदा, शेतकरी परिषदा, मागासवर्गीय महामंडळाची कर्जमाफी, विद्यार्थी परिषदा इत्यादी प्रश्नांबाबत चर्चा करण्यात येईल. थोडक्यात प्रस्तुत प्रकरणात भारिप-बहुजन महासंघाने मराठवाड्यात राजकीय व गैरराजकीय क्षेत्रात पार पाडलेलया कार्याचा चिकित्सकपणे आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष आणि शिफारशी :

या पाचव्या प्रकरणात उद्दिष्टे आणि गृहितके अनुसरुन निष्कर्ष मांडणी करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार काही महत्त्वुपर्ण शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भसूची :

१. अजय गव्हाणे, सांसदीय लोकशाहीची आयुध्ये, क्रिऐटिव्ह पब्लिकेशन नांदेड, दिनांक ६ जून २०१४.

२. बबन कांबळे, वृत्तरत्न सम्राट सामान्य ज्ञानांचा बुलंद आवाज, दिनांक २९ सप्टेंबर २०१६.

३. सी.एम.निकुंभे, दलितांनी शासनकर्ते व्हावे, सुगावा पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती मार्च २०१४.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पुणे करार, प्रबुध्द भारत पब्लिकेशन, दिनांक २६ जानेवारी २०१२.

५. इंद्रजीत गाडगीळ, भारतीय लोकशाही, अभय पब्लिकेशन, नागपूर दिनांक २२ एप्रिल २०१४.

६. फरकाटे एस.एम., महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, सागर पब्लिकेशन, नाशिक दिनांक १० फेब्रुवारी २००७.

७. ज.वि.पवार, आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड चौथा, १९७२ ते १९७७ अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई दिनांक ६ डिसेंबर २०१०.

८. एच.डी.पवार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, भुमिहीनाचा लढा, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद दिनांक ५ ऑगस्ट १९९८.

९. आय.एस.कुलकर्णी आजची आपली लोकशाही, सरिता पब्लिकेशन, मुंबई दिनांक २१ ऑगस्ट २००५.

१०. ज.वि.पवार, चौदाव्या लोकसभेचा पंचनामा, कौशल्य पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट २००४.

११. कसबे रावसाहेब, डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे १४ एप्रिल २०१७.

१२. लक्ष्मण ढोबळे, बहुचन चळवळ, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद दिनांक २६ नोव्हेंबर २००९.

१३. मेश्राम वामन, पूना पॅक्टचे दुष्परिणाम, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे दिनांक २४ सप्टेंबर २०१२.

१४. नाईकवाडे अशोक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लातूर दिनांक २६ जून २०१२.

१५. प्रकाश आंबेडकर, बहुजन चळवळ विचारसरणी आणि पक्षसंघटना, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, दिनांक १३ ऑक्टोंबर २०११.

१६. रत्नाकर खंडागळे, विचार चळवळीचे बाळासाहेब आंबेडकरांचे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद दिनांक ६ डिसेंबर २०११.

१७. शरणकुमार लिंबाळे, रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, दिलीपराज प्रकाशन, पुणे दिनांक २६ जानेवारी २००९.

१८. उत्तम कांबळे, ओबीसी चे राजकारण, प्रकाश विश्वासराव प्रकाशन, मुंबई दिनांक ९ ऑगस्ट २००८.

१९. विष्णू ढोबळे, मंडल आयोग काल, आज आणि उद्या.....? कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद दिनांक २१ मार्च २००५.

२०. विनयकुमार वासनिक, आंबेडकरी चळवळीची धार, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद दिनांक २६ जानेवारी २०१२.

संशोधक

अशोक गोविंदराव पंडित

मार्गदर्शक

डॉ.प्रभाकर दिगांबरराव सुर्यवंशी

सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख राज्यशास्त्र,

स्वा.सै.सुर्यभानजी पवार महाविद्यालय पुर्णा (ज.)

ता.पुर्णा जि.परभणी